# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.

# विद्यापरिषद

(तातडीची बैठक)

# कार्यवृत्तांत

दिनांक : ३० नोव्हेंबर, २०२१

वार : मंगळवार

वेळ: सकाळी ११:०० वाजता

स्थळ: विद्यापीठ मुख्य नाटयगृह, विद्यापीठ परिसर,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
औरंगाबाद.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम (३२) व (३३) अन्वये विहीत केल्यानुसार मा. कुलगुरु महोदयांच्या अध्यक्षतेखाली विद्यापरिषदेची बैठक **मंगळवार दिनांक ३०.११.२०२१ रोजी ठिक ११:०० वाजता** विद्यापीठाच्या मुख्य नाटयगृहामध्ये आयोजित करण्यात आलेली होती. प्रस्तूत बैठकीस खालील प्रमाणे सर्व सन्माननीय सदस्य बैठकीस उपस्थित होते.

| अ.क्र. | महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ (३२) अन्वये विद्यापरिषद संरचना | मा. अध्यक्ष/ सदस्यांची नांवे | पदनाम | उपस्थित / अनुपस्थित |
|---|---|---|---|---|
| **१.** | **३२ (३) (क),** | **मा. प्रा. डॉ. प्रमोद येवले,** | **मा. कुलगुरु तथा अध्यक्ष** | **उपस्थित** |
| **२.** | **३२ (३) (ख),** | **मा. प्रा. डॉ. श्याम शिरसाठ,** | **प्र. कुलगुरु** | **उपस्थित** |
| **३.** | **३२ (३) (ग),** | **डॉ. बी. बी. वायकर,** | **अधिष्ठाता तथा सदस्य** | **उपस्थित** |
| **४.** | **३२ (३) (ग),** | **डॉ. वाल्मिक के. सरवदे,** | **अधिष्ठाता तथा सदस्य** | **उपस्थित** |
| **५.** | **३२ (३) (ग ),** | **डॉ. प्रशांत अंमृतकर** | **अधिष्ठाता तथा सदस्य** | **उपस्थित** |
| ६. | ३२ (३) (ग ), | डॉ. चेतना सोनकांबळे | अधिष्ठाता तथा सदस्य | अनुपस्थित |
| ७. | ३२ (३) (घ ), | डॉ. दत्तात्रय के. गायकवाड | सदस्य | अनुपस्थित |
| **८.** | **३२ (३) (ङ),** | **डॉ. सचिन देशमुख,** | **सदस्य** | **उपस्थित** |
| ९. | ३२ (३) (च) (एक), | रिक्त | ... | ... |
| १०. | ३२ (३) (च) (एक), | डॉ. शिवाजीराव थोरे, | सदस्य | अनुपस्थित |
| **११.** | **३२ (३) (च) (एक),** | **डॉ. वसंत सानप,** | **सदस्य** | **उपस्थित** |
| **१२.** | **३२ (३) (च) (एक),** | **डॉ. सी. नागा वेंकट राव** | **सदस्य** | **उपस्थित** |
| १३. | ३२ (३) (च) (एक), | रिक्त | सदस्य | डॉ. राजेश गायकवाड हे सेवानिवृत्त झाल्यामुळे सदरील पद रिक्त आहे |
| १४. | ३२ (३) (च) (एक), | डॉ. श्रीमती दीपा क्षीरसागर, | सदस्य | अनुपस्थित |
| **१५.** | **३२ (३) (च) (एक),** | **डॉ. सरनाईक मधुसूदन नारायणराव,** | **सदस्य** | **उपस्थित** |
| **१६.** | **३२ (३) (च) (एक),** | **डॉ.श्रीमती एस. एस. मुळे,** | **सदस्य** | **उपस्थित** |
| १७. | ३२ (३) (च) (दोन), | डॉ. प्रवीण वक्ते, | सदस्य | अनुपस्थित |
| १८. | ३२ (३) (च) (दोन), | रिक्त | ... | ... |
| १९. | ३२ (३) (च) (तीन), | रिक्त | ... | ... |
| **२०.** | **३२ (३) (छ),** | **डॉ. मंझा रमेश रायभान,** | **सदस्य** | **उपस्थित** |
| २१. | ३२ (३) (छ), | डॉ. कोरेकर संजय लिंबराज, | सदस्य | अनुपस्थित |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| **२२.** | **३२ (३) (छ),** | **डॉ. अहिरराव जितेंद्र जनार्दन,** | **सदस्य** | **उपस्थित** |
| २३. | ३२ (३) (छ), | डॉ. खान मोहम्मद रजाउल्लाह अब्दुल्लाह खान, | सदस्य | अनुपस्थित |
| **२४.** | **३२ (३) (छ),** | **डॉ. अहिरे प्रतिभा भारत,** | **सदस्य** | **उपस्थित** |
| **२५.** | **३२ (३) (छ),** | **डॉ. खंदारे विलास भिकाजी** | **सदस्य** | **उपस्थित** |
| **२६.** | **३२ (३) (छ),** | **डॉ. पाटील अरुंधती सूर्यकांत,** | **सदस्य** | **उपस्थित** |
| २७. | ३२ (३) (छ), | डॉ.कराड प्रभाकर लहूराव | सदस्य | अनुपस्थित |
| **२८.** | **३२ (३) (ज),** | **श्री. देशमुख गोविंद बालासाहेब,** | **सदस्य** | **उपस्थित** |
| २९. | ३२ (३) (झ), | डॉ. के. राधाकृष्णन (पद्मभूषण) | सदस्य | अनुपस्थित |
| ३०. | ३२ (३) (झ), | प्रोफेसर जयेश बेल्लारे, | सदस्य | अनुपस्थित |
| ३१. | ३२ (३) (झ), | डॉ. शैलजा सिंग, | सदस्य | अनुपस्थित |
| ३२. | ३२ (३) (झ), | प्रोफेसर विश्वास जी. पांगरकर, | सदस्य | अनुपस्थित |
| ३३. | ३२ (३) (झ), | डॉ. संजीव गलांडे, | सदस्य | अनुपस्थित |
| ३४. | ३२ (३) (झ), | श्री. कोकिल प्रसाद | सदस्य | अनुपस्थित |
| ३५. | ३२ (३) (झ), | श्री. श्याम बोर्डे, | सदस्य | अनुपस्थित |
| ३६. | ३२ (३) (झ), | श्री. धनराज पिल्ले, | सदस्य | अनुपस्थित |
| ३७. | ३२ (३) (त्र), | संचालक, उच्च शिक्षण किंवा सहसंचालक, उच्च शिक्षण | सदस्य | अनुपस्थित |
| ३८. | ३२ (३) (ट), | संचालक, तंत्र शिक्षण किंवा सहसंचालक, तंत्र शिक्षण | सदस्य | अनुपस्थित |
| **३९.** | **३२ (३) (ठ),** | **डॉ. गणेश मंझा** | **सदस्य** | **उपस्थित** |
| ४०. | ३२ (३) (ड), | डॉ. अनिल एस. शंकरवार, | सदस्य | अनुपस्थित |
| ४१. | ३२ (३) (ड), | डॉ. बाबरे मोहन गणपतराव, | सदस्य | अनुपस्थित |
| **४२.** | **३२ (३) (ड),** | **डॉ. सोनटक्के भाऊसाहेब राजबा,** | **सदस्य** | **उपस्थित** |
| ४३. | ३२ (३) (ड), | डॉ. व्यंकट शंकरराव हमदे, | सदस्य | अनुपस्थित |
| **४४.** | **३२ (३) (ड),** | **डॉ. ई. आर. मार्टिन,** | **सदस्य** | **उपस्थित** |
| **४५.** | **३२ (३) (ड),** | **डॉ. आर. आर. देशमुख,** | **सदस्य** | **उपस्थित** |
| ४६. | ३२ (३) (ड), | डॉ. दादा रामनाथ शेंगुळे | सदस्य | अनुपस्थित |
| ४७. | ३२ (३) (ड), | डॉ. एम. डी. शिरसाठ, | सदस्य | अनुपस्थित |
| **४८.** | **३२ (३) (ड),** | **डॉ. रवि पांडुरंग पाटील** | **सदस्य** | **उपस्थित** |
| **४९.** | **३२ (३) (ड),** | रिक्त | ... | ... |
| **५०.** | **३२ (३) (ड),** | रिक्त | ... | ... |
| ५१. | ३२ (३) (ड), | रिक्त | ... | ... |
| ५२. | ३२ (३) (ड), | रिक्त | ... | ... |
| **५३.** | **३२ (३) (ड),** | **डॉ. संतोष भोसले** | **सदस्य** | **उपस्थित** |
| **५४.** | **३२ (३) (ड),** | **डॉ. जी. एस. साबळे** | **सदस्य** | **उपस्थित** |
| **५५.** | **३२ (३) (ड),** | **डॉ. एस. ए. घुमरे,** | **सदस्य** | **उपस्थित** |
| **५६.** | **३२ (३) (ड),** | **डॉ. के. एल. साळवे,** | **सदस्य** | **उपस्थित** |
| **५७.** | **३२ (३) (ड),** | **डॉ. सय्यद अझरुद्दीन,** | **सदस्य** | **उपस्थित** |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ५८. | ३२ (३) (ड), | डॉ. दासू वैद्य, | सदस्य | अनुपस्थित |
| **५९.** | **३२ (३) (ड),** | **डॉ. एस. आर. सांगोळे,** | **सदस्य** | **उपस्थित** |
| **६०.** | **३२ (३) (ड),** | **डॉ. उत्तम अंभोरे,** | **सदस्य** | **उपस्थित** |
| ६१. | ३२ (३) (ड), | डॉ. सय्यद अखिला गौस | सदस्य | अनुपस्थित |
| **६२.** | **३२ (३) (ड),** | **डॉ. व्यंकटेश लांब** | **सदस्य** | **उपस्थित** |
| ६३. | ३२ (३) (ड), | डॉ. यशवंत बाबूराव चव्हाण | सदस्य | अनुपस्थित |
| ६४. | ३२ (३) (ड), | रिक्त, | .. | ... |
| **६५.** | **३२ (३) (ड),** | **डॉ. आघाव नवनाथ बाबुराव,** | **सदस्य** | **उपस्थित** |
| **६६.** | **३२ (३) (ड),** | **डॉ. दिलीप रामदास खैरनार** | **सदस्य** | **उपस्थित** |
| **६७.** | **३२ (३) (ड),** | **डॉ. शांताराम रायपुरे,** | **सदस्य** | **उपस्थित** |
| **६८.** | **३२ (३) (ड),** | **डॉ. गजहंस दादासाहेब सुदामराव,** | **सदस्य** | **उपस्थित** |
| ६९. | ३२ (३) (ड), | रिक्त | .. | रिक्त |
| ७०. | ३२ (३) (ड), | रिक्त | .. | रिक्त |
| **७१.** | **३२ (३) (ड),** | **डॉ. शेख मोहम्मद अताऊल्लाह मो. खुदरतल्लाह,** | **सदस्य** | **उपस्थित** |
| **७२.** | **३२ (३) (ड),** | **डॉ. गोविंद काशिनाथ कदम** | **सदस्य** | **उपस्थित** |
| ७३. | ३२ (३) (ड), | डॉ. सिद्दिकी मो. रफिक एजाज मो. विखारोद्दीन | सदस्य | अनुपस्थित |
| ७४. | ३२ (३) (ड), | रिक्त | .. | रिक्त |
| **७५.** | **३२ (३) (ड),** | **डॉ. प्रशांत भीमसेन पगारे** | **सदस्य** | **उपस्थित** |
| ७६. | ३२ (३) (ड), | **रिक्त** | सदस्य | डॉ. शोभना जोशी यांच्या सेवानिवृत्ती मुळे रिक्त |
| ७७. | ३२ (३) (ड), | डॉ. नुझहत सुल्ताना मो. बदीउद्दीन, | सदस्य | अनुपस्थित |
| **७८.** | **३२ (३) (ढ).** | **प्रोफेसर डॉ. जयश्री सूर्यवंशी.** | **सदस्य सचिव** | **उपस्थित** |

प्रस्तुत प्रकरणी कोरम अभावी मा. कुलगुरु महोदयाच्या पूर्वपरवानगीने विद्यापीठाच्या कुलसचिव डॉ. जयश्री सूर्यवंशी यांनी **अर्धा तास** बैठक तहकुब करण्यात येत आहे, अशी घोषणा सभागृहात करण्यात आली. तद्नंतर मा. कुलगुरुंच्या परवानगी नुसार विषयनिहाय विषयपत्रिकेवर सविस्तर चर्चा करुन खालील प्रमाणे निर्णय घेण्यात आले.

प्रस्तुत प्रकरणी शैक्षणिक व प्रशासकिय अंकेक्षणासंदर्भात सद्यस्थिती बाबत मा. कुलगुरु महोदयांनी सभागृहाला अवगत करुन विद्यापीठ कार्यक्षेत्रातील काही महाविद्यालये व संस्था नियमबाहयपणे काही संस्था त्यांच्या स्तरावरुन शैक्षणिक/ प्रशासकिय दस्तऐवजामध्ये खाडाखोड किंवा इतर तत्सम नियमबाहय कृत्ये करतात तद्अनुषंगाने सर्व संबंधीतांवर कार्यवाही होणे आवश्यक आहे. शैक्षणिक गुणवत्ता कायम व अबाधित ठेवण्यासाठी या सभागृहाची फार मोठी शैक्षणिक जबाबदारी आहे. विद्यापीठ अधिनियम, नियम, परिनियम व विद्यापीठ अध्यादेशाप्रमाणे कार्यवाही करणे संदर्भात आपल्या सभागृहाची पुर्णपणे जबाबदारी आहे, असे मा.

कुलगुरु महोदयांनी संबोधित करुन मा. कुलसचिवांना विषयनिहाय विषयपत्रिकेवर चर्चा करण्यासाठी सूचित करण्यात आले.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.

तातडीची विद्यापरिषद

दिनांकः- ३०-११-२०२१.

## अनुक्रमणिका

| प्रस्ताव क्र. | प्रस्तावित विषय |
|---|---|
| ०१. | विद्यापरिषदेच्या दि. ०१.११.२०२१ रोजी झालेल्या बैठकीचा **कार्यवृत्तांत कायम करणेबाबतचा** प्रस्ताव विद्यापरिषदेसमोर सादर. |
| | **ठराव**<br>**विद्यापरिषदेने दि. ०१.११.२०२१ रोजी घेतलेल्या निर्णयानुसार बैठकीचे कार्यवृत्तांत कायम करण्यात यावे, असा ठराव पारीत करण्यात आला.** |
| ०२. | विद्यापरिषदेच्या दि. ०१.११.२०२१ रोजी झालेल्या बैठकीतील ठरावावर कार्यालयाने केलेल्या **कार्यवाहीचा अहवाल** विद्यापरिषदेसमोर सादर. |
| | **ठराव**<br>**विद्यापरिषदेने दि. ०१.११.२०२१ रोजी घेतलेल्या निर्णयांवर कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीस सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** |
| ०३. | महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १०९ अन्वये विहीत केल्यानुसार शासन निर्णय दि. १५ जून, २०२१ नुसार विस्तारीकरणाअंतर्गत विषयवाढ, अभ्यासक्रमवाढ, विद्याशाखावाढ व तुकडीवाढ साठी विहीत प्रक्रियेने विहीत शुल्कासह प्राप्त झालेल्या प्रस्तावानुसार मा. कुलगुरु महोदयांनी नियुक्त केलेल्या तज्ञ समितीच्या चौकशी अहवालानुसार **सोबत जोडण्यात असलेल्या परिशिष्ट- "A" अन्वये** विनिर्दिष्टित करण्यात आलेल्या अस्तित्वात असलेल्या जुन्या संलग्नीत महाविद्यालयांचे नॅक मुल्यांकन झालेले आहे व नॅक मुल्यांकनाचा कालावधी सुरु आहे अशा महाविद्यालयांना शासनाने विस्तारीकरणाअंतर्गत मंजूर केलेल्या अभ्यासक्रमांना महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १०८ व ११० अन्वये विहीत केलेल्या केलेल्या अटी/ शर्तीनुसार **सर्व संबंधीत महाविद्यालयातील अभ्यासक्रमांना प्रथम संलग्नीकरण प्रदान करणे बाबत** विद्यापरिषदेसमोर विचारार्थ सादर. |
| | **ठराव**<br>**प्रस्तुत प्रकरणी सविस्तर चर्चा होवून चर्चेअंती असे ठरले की, शासन निर्णय दि. १५.०६.२०२१ अन्वये विस्तारीकरणाअंतर्गत विषयवाढ, अभ्यासक्रमवाढ, तुकडीवाढ, विद्याशाखावाढ या अभ्यासक्रमासाठी मान्यता देण्यात आलेली असून सदरील महाविद्यालयाचे नॅक मुल्यांकन झालेले आहे व नॅक मुल्यांकनाचा कालावधी सुरु असल्यामुळे "A" अन्वये विनिर्दिष्टित करण्यात आलेल्या महाविद्यालयातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांना शैक्षणिक वर्ष २०२१-२०२२ करीता उर्वरीत कालावधीमध्ये विद्यापीठाने घोषित केलेल्या शैक्षणिक वेळापत्रकानुसार महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी अभ्यासक्रम पूर्ण करुन घेण्याच्या अटीवर तातपुरत्या स्वरुपाचे संलग्नीकरण देण्यात यावे, असे सर्वानुमते ठरले.** |
| ०४. | शासन निर्णय दि. ३१ जुलै, २०२० अन्वये विहीत केल्यानुसार मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित, शिवछत्रपती महाविद्यालय, सिडको, औरंगाबाद या अस्तित्वात असलेल्या संलग्नीत महाविद्यालयास विस्तारीकरणाअंतर्गत बी. कॉम. या अभ्यासक्रमास शैक्षणिक वर्ष २०२०-२०२१ करीता महाराष्ट्र शासनाने मान्यता दिलेली असून सदरील महाविद्यालयाने माहे सप्टेंबर १९-०९-२०२० अन्वये उशिरा प्रस्ताव सादर केल्यामुळे सदरील महाविद्यालयाच्या बी. कॉम. |

| | |
|---|---|
| | या अभ्यासक्रमास **प्रपत्र "ब" अन्वये** विनर्दिष्टित करण्यात आलेल्या संकिर्ण माहिती नुसार डॉ. वीणा हुंबे यांच्या अध्यक्षतेखाली नियुक्त केलेल्या समितीने शिफारशीत केल्याप्रमाणे सदरील अभ्यासक्रमास शैक्षणिक वर्ष २०२१-२०२२ करीता प्रथम संलग्नीकरण प्रदान करणे बाबतचा प्रस्ताव विद्यापरिषदेसमोर विचारार्थ सादर. |
| | ठराव<br>प्रस्तुत प्रकरणी सविस्तर चर्चा होवून चर्चेअंती असे ठरले की, शासन निर्णय दि. ३१ जुलै, २०२० अन्वये प्रस्तुत संस्थेच्या शिवछत्रपती महाविद्यालय, सिडको, औरंगाबाद या महाविद्यालयास विस्तारीकरणाअंतर्गत बी.कॉम. या अभ्यासक्रमास शैक्षणिक वर्ष २०२०-२०२१ करीता शासनाने मान्यता दिलेली होती, परंतु सदरील संस्थेने उशीरा प्रस्ताव सादर केल्यामुळे विद्यापीठाने नियुक्त केलेल्या डॉ. विणा हुंबे यांच्या अध्यक्षतेखाली नियुक्त केलेल्या समितीने सादर केलेल्या अहवालानुसार संबंधीत महाविद्यालयाचे नॅक मुल्यांकन झालेले असून नॅक मुल्यांकनाचा कालावधी सुरु असल्यामुळे सदरील महाविद्यालयाच्या बॉ.कॉम. अभ्यासक्रमास शैक्षणिक वर्ष २०२१-२०२२ करीता प्रथम संलग्नीकरण देण्यात यावे, असा ठराव पारीत करण्यात आला. |
| ०५. | महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १०९ अन्वये विहीत केल्यानुसार शासन निर्णय दि. १५ जून, २०२१ नुसार विस्तारीकरणाअंतर्गत विषयवाढ, अभ्यासक्रमवाढ, विद्याशाखावाढ, व तुकडीवाढ साठी विहीत प्रक्रियेने विहीत शुल्कासह प्राप्त झालेल्या प्रस्तावानुसार मा. कुलगुरु महोदयांनी नियुक्त केलेल्या तज्ञ समितीच्या चौकशी अहवालानुसार **सोबत जोडण्यात असलेल्या परिशिष्ट- "C" अन्वये** विनर्दिष्टित करण्यात आलेल्या अस्तित्वात असलेल्या जुन्या संलग्नीत महाविद्यालयांचे **नॅक मुल्यांकन झालेले नाही परंतू शासन निर्णय दि. १५ जून, २०२१ अट क्र. (७) अन्वये एक वर्षाच्या आत नॅक मुल्यांकनासाठी अर्ज करणे अनिवार्य राहील,** असा अल्लेख करण्यात आलेल्या सर्व संबंधीत महाविद्यालयांना शासनाने विस्तारीकरणाअंतर्गत मंजूर केलेल्या अभ्यासक्रमांना महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १०८ व ११० अन्वये विहीत केलेल्या अटी/ शर्तीनुसार सर्व संबंधीत महाविद्यालयातील अभ्याक्रमांना प्रथम संलग्नीकरण प्रदान करणे बाबत विद्यापरिषदेसमोर विचारार्थ सादर. |
| | ठराव<br>प्रस्तुत प्रकरणी सविस्तर चर्चा होवून चर्चेअंती असे ठरले की, विस्तारीकरणाअंतर्गत मंजूर करण्यात आलेल्या अभ्यासक्रमाबाबत अस्तित्वात असलेल्या जुन्या महाविद्यालयाचे नॅक मुल्यांकन झालेले नसुन आवश्यक अध्यापक कर्मचाऱ्याची नियुक्ती न केल्यामुळे महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम ११० (४) व कलम ११० (२) (घ) तसेच संलग्नीकरणाबाबतचे यूजीसी रेग्युलेशन-२००९ अन्वये संबंधीत महाविद्यालय विहीत अटी/ शर्ती पूर्ण करीत नसल्यामुळे परिशिष्ट- "C" अन्वये विनर्दिष्टित करण्यात आलेल्या महाविद्यालयातील अभ्यासक्रमांना शैक्षणिक वर्ष २०२१-२०२२ ऐवजी सर्व संबंधीत अटींची पुर्तता केल्यानंतर शैक्षणिक वर्ष २०२२-२०२३ पासून प्रथम संलग्नीकरण देण्यात यावे, असा ठराव पारीत करण्यात आला. |
| ०६. | महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १०९ अन्वये विहीत केल्यानुसार शासन निर्णय दि. ३१ ऑगस्ट, २०२१ नुसार **नवीन महाविद्यालयांना प्रथम संलग्नीकरण मिळणे संदर्भात विहीत प्रक्रियेने विहीत शुल्कासह प्राप्त झालेल्या प्रस्तावानुसार** मा. कुलगुरु महोदयांनी नियुक्त केलेल्या तज्ञ समितीच्या चौकशी अहवालानुसार **सोबत जोडण्यात असलेल्या परिशिष्ट- "D" अन्वये** विनर्दिष्टित करण्यात आलेल्या सदरील संस्थेच्या जुन्या महाविद्यालयांचे |

| | |
|---|---|
| | **नॅक मुल्यांकन झालेले नाही परंतू शासन निर्णयामध्ये सक्षम प्राधिकरणाने विहीत केलेल्या कालावधीत नॅक मुल्यांकन करुन घेण्याच्या अटीवर** नवीन महाविद्यालयांना शासनाने दिलेल्या अंतीम मान्यतेनुसार विविध अभ्यासक्रमांसाठी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १०८ व ११० अन्वये विहीत केलेल्या अटी/ शर्तीनुसार सर्व संबंधीत महाविद्यालयातील अभ्याक्रमांना प्रथम संलग्नीकरण प्रदान करणे बाबत विद्यापरिषदेसमोर विचारार्थ सादर. |
| | **ठराव**<br>**प्रस्तुत प्रकरणी सविस्तर चर्चा होवून चर्चेअंती असे ठरले की, शासन निर्णय दि. ३१ ऑगस्ट, २०२१ अन्वये भिल्लदरी बहुउद्देशिय शिक्षण संस्थेचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, वाटूर ता. परतुर जि. जालना या ठिकाणासाठी मान्यता दिलेली आहे, परंतू महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम ११० (४) अन्वये संबंधीत महाविद्यालयाच्या संस्थेचे राजर्षी शाहू कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, पारध ता. भोकरदन, जि. जालना या ठिकाणी असून सदरील महाविद्यालयाचे नॅक मुल्यांकन न झाल्यामुळे व सदरील महाविद्यालयामध्ये नियमामध्ये विहीत केल्यानुसार अध्यापकांची नियुक्ती न केल्यामुळे सर्व संबंधीत अटींची पुर्तता केल्यानंतर सदरील महाविद्यालयास शैक्षणिक वर्ष २०२१-२०२२ ऐवजी शैक्षणिक वर्ष २०२२-२०२३ करीता प्रथम संलग्नीकरण देणेबाबत कार्यवाही करण्यात यावी, असे सर्वानुमते ठरले.** |
| ७. | श्री. साई सामाजिक शिक्षण संस्थेचे संचलित, श्री. साई अभियांत्रिकी महाविद्यालय, परदरी तांडा, ता. जि. औरंगाबाद या महाविद्यालयाच्या संदर्भात प्राप्त झालेल्या तक्रारीनुसार मा. कुलगुरु महोदयांनी विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता मा. डॉ. भालचंद्र वायकर यांच्या अध्यक्षतेखाली नियुक्त केलेल्या चौकशी समितीने सादर केलेल्या अहवालानुसार सदरील महाविद्यालयाकडे महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १०८ व AICTE या केंद्रीय प्राधिकरणाने निर्धारीत केलेल्या निकषानुसार आवश्यक पायाभुत सुविधा उपलब्ध नसून म.सा.वि.अ. २०१६ कलम ९७ अन्वये सदरील महाविद्यालयाने महाविद्यालय विकास समिती गठीत नकेल्यामुळे सदरील महाविद्यालयाचे नाव शैक्षणिक वर्ष २०२१-२०२२ करीता No Admission संवर्गात समाविष्ठ करणे बाबत शासनाच्या CET सेल या विभागास कळविणे बाबत मा. कुलगुरु महोदयांनी केलेल्या कार्यवाहीस मान्यता देणे संदर्भात विद्यापरिषदेसमोर विचारार्थ सादर. |
| | **ठराव**<br>**प्रस्तुत प्रकरणी सविस्तर चर्चा होवून चर्चेअंती असे ठरले की, श्री. साई सामाजिक शिक्षण संस्थेचे संचलित, श्री. साई अभियांत्रिकी महाविद्यालय, परदरी तांडा, ता. जि. औरंगाबाद या महाविद्यालयाच्या संदर्भात प्राप्त झालेल्या तक्रारीनुसार मा. कुलगुरु महोदयांनी विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता मा. डॉ. भालचंद्र वायकर यांच्या अध्यक्षतेखाली नियुक्त केलेल्या चौकशी समितीने सादर केलेल्या अहवालानुसार सदरील महाविद्यालयाकडे महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १०८ व AICTE या केंद्रीय प्राधिकरणाने निर्धारीत केलेल्या निकषानुसार आवश्यक पायाभुत सुविधा उपलब्ध नसून म.सा.वि.अ. २०१६ कलम ९७ अन्वये सदरील महाविद्यालयाने महाविद्यालय विकास समिती गठीत नकेल्यामुळे सदरील महाविद्यालयाचे नाव शैक्षणिक वर्ष २०२१-२०२२ करीता No Admission संवर्गात समाविष्ठ करणे बाबत शासनाच्या CET सेल या विभागास कळविणे बाबत मा. कुलगुरु महोदयांनी केलेल्या कार्यवाहीस मान्यता देण्यात यावी, असे सर्वानुमते ठरले.** |

| | |
|---|---|
| ऐनवेळचा प्रस्ताव क्र. ०८. | मा. कुलगुरु महोदय यांच्या आदेशान्वये ऐनवेळचे प्रस्ताव विद्यापरिषदेच्या विचारार्थ सादर. |
| ८ (१) | विद्यापीठ कार्यक्षेत्रातील सर्व संलग्नीत महाविद्यालये व संस्था येथे पदवी स्तरावर शिकविण्यात येणारे अभ्यासक्रम विद्यापीठ अनुदान आयोग व महाराष्ट्र शासनाने निर्धारीत केलेल्या धोरणानुसार Choice Based Credit System [CBCS] अन्वये पदवी स्तरावर सर्व विद्याशाखेकरीता एकसमान पॅटर्न राबविणे संदर्भात अधिष्ठाता मंडळाने पॅटर्न निश्चित करणेबाबत प्रस्ताव मांडण्यात आला. |
| | **ठराव**<br>प्रस्तुत प्रकरणी सविस्तर चर्चा होवून चर्चेअंती असे ठरले की, विद्यापीठ कार्यक्षेत्रातील सर्व संलग्नीत महाविद्यालये व संस्था येथे पदवी स्तरावर शिकविण्यात येणारे अभ्यासक्रम विद्यापीठ अनुदान आयोग व महाराष्ट्र शासनाने निर्धारीत केलेल्या धोरणानुसार **Choice Based Credit System [CBCS]** अन्वये पदवी स्तरावर सर्व विद्याशाखेकरीता एकसमान पॅटर्न राबविणे संदर्भात अधिष्ठाता मंडळामार्फत शैक्षणिक वर्ष २०२३-२०२३ करीता पॅटर्न निश्चित करण्यात यावे व तद्अनुषंगाने सर्व अभ्यास मंडळ/ तदर्थ मंडळांनी अभ्यासक्रम तयार करावे, असे सर्वानुमते ठरले. |
| ८ (२) | विद्यापीठ कार्यक्षेत्रातील संशोधन करणाऱ्या विद्यार्थ्यांनी पीएच.डी. अभ्यासक्रमाचा प्रबंध अनुज्ञेय असेल त्या अभ्यासक्रमासाठी मराठी भाषेमध्ये विद्यापीठास सादर केल्यास सदरील प्रबंधाचे मुल्यांकन करण्यासाठी सदरील प्रबंध महाराष्ट्रातील उपलब्ध परिक्षकाकडे मुल्यांकनासाठी पाठविण्यात यावे, असा प्रस्ताव मांडण्यात आला. |
| | **ठराव**<br>**प्रस्तुत प्रकरणी सविस्तर चर्चा होवून चर्चेअंती असे ठरले की, विद्यापीठ कार्यक्षेत्रातील संशोधन करणाऱ्या विद्यार्थ्यांनी पीएच.डी. अभ्यासक्रमाचा प्रबंध अनुज्ञेय असेल त्या अभ्यासक्रमासाठी मराठी भाषेमध्ये विद्यापीठास सादर केल्यास सदरील प्रबंधाचे मुल्यांकन करण्यासाठी सदरील प्रबंध महाराष्ट्रातील उपलब्ध परिक्षकाकडे मुल्यांकनासाठी पाठविण्यात यावे व तद्अनुषंगाने पीएच.डी. अध्यादेश-१००९ अन्वये करण्यात आलेल्या तरतुदीमध्ये आवश्यक दुरुस्ती करणेबाबत यथा योग्य कार्यवाही करण्यात यावी, असे सर्वानुमते ठरले.** |
| ८ (३) | महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम ११० (४) अन्वये विद्यापीठ कार्यक्षेत्रातील संलग्नीत महाविद्यायांनी नॅक मुल्यांकन/ पुनर्रमुल्यांकनासाठी पात्र असूनही विहीत मुदतीत सर्व संबंधीत महाविद्यालयांचे नॅक मुल्यांकन झालेले नसेल, अशा महाविद्यालयांचे नियमामध्ये विहीत केल्यानुसार विहीत केलेल्या प्रक्रियेने संलग्नीकरण रद्द करणेबाबत नोटीस बजावण्यात यावी, असा प्रस्ताव मांडण्यात आला. |
| | **ठराव**<br>**प्रस्तुत प्रकरणी सविस्तर चर्चा होवून चर्चेअंती असे ठरले की, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम ११० (४) अन्वये विद्यापीठ कार्यक्षेत्रातील संलग्नीत महाविद्यायांनी नॅक मुल्यांकन/ पुनर्रमुल्यांकनासाठी पात्र असूनही विहीत मुदतीत सर्व संबंधीत महाविद्यालयांचे नॅक मुल्यांकन झालेले नसेल, अशा महाविद्यालयांचे नियमामध्ये विहीत केल्यानुसार विहीत केलेल्या प्रक्रियेने संलग्नीकरण रद्द करणेबाबत महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२० अन्वये विहीत केल्यानुसार अधिष्ठाता मंडळामार्फत नोटीस बजावण्यात यावी, असे सर्वानुमते ठरले.** |
| ८ (४) | शैक्षणिक वर्ष २०२१-२०२२ पासून पुढे विद्यापीठ कार्यक्षेत्रातील महाविद्यालयामध्ये रिक्त असलेली सर्व प्रवर्गातील अध्यापकांची पदे भरण्यासाठी विद्यापीठ स्तरावरुन केंद्रीय पध्दतीने जाहीरात देवून अर्जदाराने सदरील अर्जाची प्रत संस्थेस तसेच विद्यापीठाच्या आरक्षण विभागास सादर करावी, असा प्रस्ताव पारीत करण्यात आला. |

| | ठराव<br>प्रस्तुत प्रकरणी सविस्तर चर्चा होवून चर्चेअंती असे ठरले की, शैक्षणिक वर्ष २०२१-२०२२ पासून पुढे विद्यापीठ कार्यक्षेत्रातील महाविद्यालयामध्ये रिक्त असलेली सर्व प्रवर्गातील अध्यापकांची पदे भरण्यासाठी विद्यापीठ स्तरावरुन केंद्रीय पध्दतीने जाहीरात देवून अर्जदाराने सदरील अर्जाची प्रत संस्थेस तसेच विद्यापीठाच्या आरक्षण विभागास सादर करावी तद्अनुषंगाने आरक्षण विभागाने सर्व संबंधीत शैक्षणिक संस्था/ महाविद्यालयांना परिपत्रकाद्वारे कळविण्यात यावे, असा ठराव पारीत करण्यात आला. |
|---|---|

प्रस्तुत प्रकरणी मा. कुलसचिव डॉ. जयश्री सूर्यवंशी यांनी उपस्थित सर्व सन्मानीय सदस्य, मा. कुलगुरु, मा प्र कुलगुरु तसेच इतर उपस्थित सर्व विद्यापीठाचे अधिकारी यांचे आभार व्यक्त करुन राष्ट्रगीता नंतर बैठकीची सांगता होईल, असे विद्यापरिषदेचे अध्यक्ष तथा मा. कुलगुरु महोदय यांच्या परवागीने जाहीर करण्यात आले.

उपकुलसचिव,
शैक्षणिक विभाग

कुलसचिव
तथा सदस्य सचिव

मा. प्र कुलगुरु

मा. कुलगुरु

07 DEC 2021

--=**=--

Dr.K*301121/-